# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

## Monthly Progress Report - August 2026

### ACADEMIC ACHIEVEMENT

### 1. Reader's Theatre Activity Grade 9

Grade 9 students participated in a Reader's Theatre activity based on the chapter Twin Melodies. Working collaboratively, students read and performed selected parts using voice modulation, expressions and appropriate pauses.

The activity helped students explore the characters, emotions and central ideas of the chapter in an engaging and interactive manner. It encouraged collaboration, active listening, peer learning and confident participation.

Students demonstrated improved expressive reading, communication and presentation skills while experiencing reading as a joyful and creative learning process. The activity also fostered greater interest in theatre and performance.



**१. रीडर्स थिएटर उपक्रम - इयत्ता ९ वी**

इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांनी 'ट्विन मेलडीज' या पाठावर आधारित 'रीडर्स थिएटर' या उपक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी गटामध्ये सहकार्याने पाठातील निवडक भागांचे वाचन व सादरीकरण केले. त्यांनी आवाजातील चढ-उतार, योग्य भावभावना आणि आवश्यक ठिकाणी विराम यांचा प्रभावी वापर केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पाठातील पात्रे, भावना आणि मध्यवर्ती कल्पना अधिक रंजक व संवादात्मक पद्धतीने समजून घेण्यास मदत झाली. तसेच सहकार्य, सक्रिय ऐकणे, समवयस्कांकडून शिकणे आणि आत्मविश्वासाने सहभाग घेणे यांना प्रोत्साहन मिळाले.

विद्यार्थ्यांनी अभिव्यक्तिपूर्ण वाचन, संवादकौशल्य आणि सादरीकरण कौशल्यांमध्ये सुधारणा दर्शवली, तसेच वाचन ही एक आनंददायी व सर्जनशील अध्ययन प्रक्रिया आहे असा अनुभव घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाट्य आणि सादरीकरणाबद्दल अधिक रुची निर्माण झाली.

### 2. Differentiated instruction (Science cluster)

A PD session on "Designing High-Rigor Science Learning Experiences" was conducted for science teachers. Through interactive activities such as Never Have I Ever, Who Would You Hire? and the Lesson Makeover Challenge, teachers explored the characteristics of high-rigor tasks.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

The session helped teachers differentiate between activities that are simply engaging and those that promote deeper thinking, application, reasoning, justification and problem-solving. Teachers collaboratively redesigned traditional science activities and reflected on their classroom application.



**२. वैविध्यपूर्ण अध्यापन पद्धती (विज्ञान गट)**

विज्ञान शिक्षकांसाठी “उच्च-दर्जाचे विज्ञान शिकण्याचे अनुभव तयार करणे” या विषयावर एका शिक्षक व्यावसायिक विकास सत्राचे आयोजन करण्यात आले होते. 'नेव्हर हॅव आय एव्हर' , 'व्हू वूड यू हायर?' आणि 'लेसन मेकओव्हर चॅलेंज' यांसारख्या परस्परसंवादी उपक्रमांद्वारे शिक्षकांनी उच्च-दर्जाच्या घटकांची वैशिष्ट्ये समजून घेतली.

या सत्रामुळे शिक्षकांना फक्त आकर्षक असणारे उपक्रम आणि सखोल विचार, वापर/उपयोजन, तर्कशुद्धता, समर्थन व समस्या निवारणास प्रोत्साहन देणारे उपक्रम यांमधील फरक ओळखण्यास मदत झाली. शिक्षकांनी सहकार्याने पारंपरिक विज्ञान उपक्रमांची पुनर्रचना केली आणि त्यांचा वर्गातील वापरावर विचारमंथन केले.

## 3. Performance task - KGs

A three-day Performance Task, “Me and My Body”, was conducted for KG students through rotation-based learning stations. Jr. KG explored healthy habits, self-care, senses and pre-literacy, while Sr. KG focused on body parts, the five senses and self-identity through hands-on activities.

Children worked in pairs and were observed using structured checklists instead of a written test. The activity encouraged exploration, independence and peer learning.

Children demonstrated improved confidence, motor coordination, communication and empathetic behaviour. The station-based approach increased engagement and provided teachers with individualised observations of children’s development.

**३. प्रात्यक्षिक कार्य - केजी**

केजी च्या विद्यार्थ्यांसाठी ‘मी आणि माझे शरीर’ या विषयावर आधारित ३ दिवसांचे प्रात्यक्षिक कार्य रोटेशन-बेस्ड (सत्रनिहाय बदलणाऱ्या) लर्निंग स्टेशनच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. ज्युनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनी निरोगी सवयी, स्व-काळजी, ज्ञानेंद्रिये आणि प्राथमिक साक्षरता या घटकांचा सराव केला; तर सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतींद्वारे शरीराचे भाग, पाच ज्ञानेंद्रिये आणि स्व-ओळख यावर लक्ष केंद्रित केले.

विद्यार्थ्यांनी जोडीने काम केले आणि लेखी परीक्षेऐवजी रचनाबद्ध तपासणीसूचीचा वापर करून त्यांचे निरीक्षण करण्यात आले. या उपक्रमामुळे शोधवृत्ती, स्वावलंबन आणि समवयस्कांकडून शिकण्याच्या वृत्तीला प्रोत्साहन मिळाले.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्नायूंचे समन्वय, संवादकौशल्य आणि सहानुभूतीपूर्वक वर्तनात सुधारणा दिसून आली. स्टेशन-बेस्ड पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आणि शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याच्या विकासाचे वैयक्तिकरीत्या निरीक्षण करणे सोपे झाले.

## 4. School Leaders’ PD - Reflection

A professional development session for School Leaders was conducted by the Central Team of Akanksha, focusing on reflection, skill-building and forward planning. The session included the Taking Stock



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

reflection exercise, a Behaviour Management workshop based on the Prevent, Respond & Restore framework, and a session on understanding Gen Alpha learners.



Leaders also worked on the School Development Review (SDR), prepared for an upcoming musical event, and explored the use of AI in classrooms through an “AI in Action” session on Khanmigo.

The session encouraged leaders to reflect on existing practices, identify areas for improvement and plan actionable next steps in behaviour management, student engagement, school development and the effective use of technology.

**४. शाळा प्रमुखांचे व्यावसायिक विकास सत्र - विचारमंथन**

'आकांक्षा' च्या मध्यवर्ती टीमद्वारे शाळा प्रमुखांसाठी विचारमंथन, कौशल्य-विकास आणि भविष्यातील नियोजनावर केंद्रित एका व्यावसायिक विकास सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रामध्ये 'टेकिंग स्टॉक' ही विचारमंथन कृती, 'प्रतिबंध, प्रतिसाद आणि पुनर्संचयित करणे' या आराखड्यावर आधारित 'वर्तणूक व्यवस्थापन' कार्यशाळा आणि 'जनरेशन अल्फा' विद्यार्थ्यांचे आकलन या विषयावरील एका सत्राचा समावेश होता. या सत्राने शाळा प्रमुखांना त्यांच्या सध्याच्या पद्धतींवर विचारमंथन करण्यास, सुधारणेची क्षेत्रे ओळखण्यास आणि वर्तणूक व्यवस्थापन, विद्यार्थ्यांचा सहभाग, शाळेचा विकास व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांबाबत कृतीयोग्य पुढील पावसांचे नियोजन करण्यास प्रोत्साहित केले.

शाळा प्रमुखांनी शाळा विकास पुनरावलोकन यावरही काम केले, आगामी संगीत कार्यक्रमाची तयारी केली आणि 'खानमिगो' वरील “एआय इन ॲक्शन” सत्राद्वारे वर्गांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबद्दल जाणून घेतले.

## 5. TL PD - School Visit, Trend Analysis & Student Culture

The TL PD held on 18 August 2026 included a school visit, a collective debrief of emerging trends and discussions around student culture. TLs engaged in group work, brainstorming, and analysis to look at schools from a broader, “bird’s-eye” perspective and identify insights that could be taken back to their own schools. "TLs were able to identify key trends, reflect on their own school practices, and recognise areas of strength and opportunities for improvement. The discussions enabled TLs to take back relevant insights and actionable ideas to their respective schools.

**५. शिक्षक मार्गदर्शक व्यावसायिक विकास - शाळा भेट, कल विश्लेषण आणि विद्यार्थी संस्कृती**

१८ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'शिक्षक मार्गदर्शक व्यावसायिक विकास' सत्रामध्ये शाळा भेट, नवीन प्रवाहांचे एकत्रित विश्लेषण आणि विद्यार्थी संस्कृतीभोवती चर्चा यांचा समावेश होता. शाळांकडे अधिक व्यापक, विहंगम ('बर्ड्स-आय') दृष्टिकोनातून पाहण्यासाठी आणि आपल्या स्वतःच्या शाळांमध्ये अमलात आणता येतील अशा संकल्पना शोधण्यासाठी शिक्षक मार्गदर्शकांनी गटकार्य, विचारमंथन आणि विश्लेषणामध्ये भाग घेतला.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

"शिक्षक मार्गदर्शकांना मुख्य प्रवाह ओळखता आले, त्यांच्या स्वतःच्या शाळेतील पद्धतींवर विचारमंथन करता आले आणि त्यांच्यातील सबळ बाजू तसेच सुधारणेच्या संधी स्पष्टपणे समजल्या. या चर्चांमुळे शिक्षक मार्गदर्शकांना आपापल्या शाळांमध्ये लागू करता येतील अशा संबंधित संकल्पना आणि कृतीयोग्य कल्पना घेऊन जाणे शक्य झाले."

## 6. Padlet Activity in Grade 7




In Grade 7, Padlet is used as a pre-work activity to activate students' prior knowledge before introducing a new concept. The SST teacher shares the Padlet link through the respective WhatsApp groups, where students post their responses and ideas.

The activity encourages students to think independently and express their perspectives. Teachers use the responses to identify prior knowledge, misconceptions and varied viewpoints, which helps initiate meaningful discussions and increase student participation.

Going forward, Padlet will be strengthened through varied pre-work activities such as polls, images, thought-provoking questions and reflection tasks. Student responses will be used to plan differentiated discussions and promote collaboration, critical thinking and deeper learning.

**६. इयत्ता ७ वी मधील पॅडलेट उपक्रम**

इयत्ता ७ वी मध्ये, नवीन संकल्पना शिकवण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानाला उजाळा देण्यासाठी पॅडलेटचा वापर पूर्वतयारी उपक्रम म्हणून केला जातो. सामाजिक शास्त्राचे शिक्षक संबंधित व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे पॅडलेटची लिंक शेअर करतात, जिथे विद्यार्थी त्यांची उत्तरे आणि विचार पोस्ट करतात.

हा उपक्रम विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करण्यास आणि त्यांचे दृष्टिकोन मांडण्यास प्रोत्साहित करतो. शिक्षक विद्यार्थ्यांच्या उत्तरांचा वापर त्यांचे पूर्वज्ञान, गैरसमज आणि विविध दृष्टिकोन समजून घेण्यासाठी करतात, ज्यामुळे अर्थपूर्ण चर्चा सुरू करण्यास आणि विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यास मदत होते.

पुढील काळात पोल, चित्रे, विचार करायला लावणारे प्रश्न आणि विचारमंथन कार्ये यांसारख्या विविध पूर्वतयारी उपक्रमांद्वारे पॅडलेटचा वापर अधिक सक्षम केला जाईल. विद्यार्थ्यांच्या उत्तरांचा वापर वैविध्यपूर्ण चर्चांचे नियोजन करण्यासाठी तसेच सहकार्य, गंभीर/चिकित्सक विचारसरणी आणि सखोल शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी केला जाईल.

## 7. PSL workshop – Grade 5 Mathematics: Building Conceptual Understanding of Fractions

A professional development workshop on fractions for Grade 5 teachers was conducted as part of the PSL × TAF × TFI partnership. The session focused on strengthening teachers' conceptual and pedagogical understanding of fractions through hands-on and visual learning.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

Teachers explored the area model, fraction strips and number lines to understand part-whole relationships, equivalent fractions, and comparison. They also practised modelling mixed and improper fractions using manipulatives and discussed common student misconceptions.

The session included collaborative lesson planning, reflection and Q&A, enabling teachers to adapt the strategies to their classrooms. Teachers reported increased confidence in using multiple visual models and a stronger conceptual understanding of fractions, which can support more meaningful student learning.

**७. पीएसएल कार्यशाळा – इयत्ता ५ वी गणित: अपूर्णांकाची संकल्पनात्मक समज विकसित करणे**

पीएसएल × टीएएफ × टीएफआय भागीदारीचा एक भाग म्हणून इयत्ता ५ वीच्या शिक्षकांसाठी अपूर्णांक विषयावर एका व्यावसायिक विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्यक्ष कृती आणि दृकश्राव्य (visual) शिकण्याच्या पद्धतींद्वारे शिक्षकांची अपूर्णांकांची संकल्पनात्मक व अध्यापनशास्त्राची समज मजबूत करण्यावर या सत्रात भर देण्यात आला.

शिक्षकांनी भाग-पूर्ण संबंध, सममूल्य अपूर्णांक आणि तुलना समजून घेण्यासाठी एरिया मॉडेल , फ्रॅक्शन स्ट्रिप्स आणि संख्यारेषेचा अभ्यास केला. त्यांनी शैक्षणिक साहित्याचा वापर करून पूर्णांकयुक्त अपूर्णांक आणि अंशाधिक अपूर्णांक तयार करण्याचा सराव केला तसेच विद्यार्थ्यांच्या सामान्य गैरसमजांवर चर्चा केली.

या सत्रामध्ये सहकार्याने पाठ टाचण/नियोजन , विचारमंथन आणि प्रश्नोत्तरांचा समावेश होता, ज्यामुळे शिक्षकांना या पद्धती आपल्या वर्गात लागू करणे शक्य झाले. शिक्षकांनी अनेक दृकश्राव्य मॉडेल्स वापरण्याबाबत वाढलेला आत्मविश्वास आणि अपूर्णांकांची अधिक मजबूत संकल्पनात्मक समज व्यक्त केली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक अर्थपूर्ण रीतीने शिकण्यास मदत होईल.

## STUDENTS VOICE AND WELL-BEING

### 8. Field Trip to Museum of Solutions (MUSO)



The students participated in an engaging and enriching visit to the museum, providing them with an opportunity to experience hands-on learning beyond the classroom. The visit focused on STEAM (Science, Technology, Engineering, Art, and Mathematics), sustainability, and real-world problem-solving.

During the guided tour, students explored various immersive labs and exhibits, including the Play Lab, Make Lab, Grow Lab, and Discover Lab. They



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

actively participated in interactive learning activities that encouraged them to observe, explore, experiment, and understand concepts through practical experiences.

The visit also included group discussions and question-and-answer sessions, where students shared their ideas, asked questions, and learned from their peers. They enthusiastically shared their observations and connected their experiences at the museum with concepts learned in the classroom.

As a follow-up activity, students expressed their learning through drawing and writing based on their museum experience. This provided them with an opportunity to reflect on what they had observed and learned during the visit.

Overall, the museum visit was a meaningful experiential learning opportunity. It encouraged curiosity, creativity, observation, questioning, collaboration, and critical thinking while helping students make meaningful connections between classroom learning and the real world.

**८. म्युझियम ऑफ सोल्यूशन्सची क्षेत्रभेट**

विद्यार्थ्यांनी संग्रहालयाला दिलेल्या एका रंजक आणि ज्ञानवर्धक भेटीत सहभाग घेतला. या भेटीमुळे त्यांना वर्गाबाहेर प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाली. ही भेट स्टीम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, कला आणि गणित), शाश्वतता आणि प्रत्यक्ष जीवनातील समस्यांचे निराकरण यांवर केंद्रित होती.

मार्गदर्शकासह घेतलेल्या या फेरीत विद्यार्थ्यांनी खेळ प्रयोगशाळा, निर्मिती प्रयोगशाळा, संवर्धन प्रयोगशाळा आणि शोध प्रयोगशाळा यांसारख्या विविध नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा व प्रदर्शनांची पाहणी केली. विद्यार्थ्यांनी परस्परसंवादी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमांमुळे त्यांना प्रत्यक्ष अनुभवांच्या माध्यमातून निरीक्षण करणे, शोध घेणे, प्रयोग करणे आणि संकल्पना समजून घेण्यास प्रोत्साहन मिळाले.

या भेटीमध्ये गटचर्चा आणि प्रश्नोत्तर सत्रांचाही समावेश होता. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना मांडल्या, प्रश्न विचारले आणि सहकाऱ्यांकडून नवीन गोष्टी शिकून घेतल्या. त्यांनी आपली निरीक्षणे उत्साहाने मांडली आणि संग्रहालयातील अनुभवांची सांगड वर्गात शिकलेल्या संकल्पनांशी घातली.

पुढील उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांनी संग्रहालयातील अनुभवांवर आधारित चित्रे काढून व लेखन करून आपले विचार व्यक्त केले. यामुळे त्यांना भेटीदरम्यान काय पाहिले आणि काय शिकले यावर आत्मचिंतन करण्याची संधी मिळाली.

एकंदरीत, ही संग्रहालय भेट प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची अर्थपूर्ण संधी ठरली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता, निरीक्षणकौशल्य, प्रश्न विचारण्याची वृत्ती, सहकार्य आणि चिकित्सक विचारसरणी यांना चालना मिळाली. तसेच वर्गातील शिक्षण आणि प्रत्यक्ष जीवनातील अनुभव यांच्यात अर्थपूर्ण संबंध जोडण्यास मदत झाली.

9. **Grade 6 - Experiential Learning Through Drama**



On 20 August 2026, 15 Grade 6 students presented a short drama based on *The Boy and the Drum*, reaching approximately 160 Grade 6 students. The chapter was adapted into a simple, student-friendly script, enabling students to prepare within four days . Students performed different roles, including actors and narrators, while practising expressions, voice modulation, movements, and stage presence.The activity promoted teamwork, confidence, communication, creativity, and presentation

skills. The performance made classroom learning more engaging, experiential, and collaborative, helping students understand and articulate the story's events and key message of being kind without expecting anything in return.

**९. इयत्ता ६ वी – नाटकाच्या माध्यमातून अनुभवजन्य शिक्षण**

२० ऑगस्ट २०२६ रोजी, इयत्ता ६ वीतील १५ विद्यार्थ्यांनी "मुलगा आणि ढोल" या धड्यावर आधारित एक लघुनाटिका सादर केली. या सादरीकरणाचा लाभ इयत्ता ६ वीतील अंदाजे १६० विद्यार्थ्यांना झाला.

धड्याचे विद्यार्थ्यांना सहज समजेल अशा सोप्या संहितेत रूपांतर करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना चार दिवसांत सादरीकरणाची तयारी करता आली. विद्यार्थ्यांनी अभिनेता आणि निवेदक यांसह विविध भूमिका साकारल्या. तसेच हावभाव, आवाजातील चढ-उतार, हालचाली आणि रंगमंचावरील वावर यांचा सराव केला.

या उपक्रमामुळे सांघिक कार्य, आत्मविश्वास, संवादकौशल्य, सर्जनशीलता आणि सादरीकरण कौशल्यांना प्रोत्साहन मिळाले. या सादरीकरणामुळे वर्गातील शिक्षण अधिक मनोरंजक, अनुभवाधारित आणि सहकार्यपूर्ण झाले. तसेच विद्यार्थ्यांना कथेतील घटना आणि कोणत्याही अपेक्षेशिवाय दयाळूपणे वागण्याचा मुख्य संदेश  समजून घेण्यास आणि तो प्रभावीपणे व्यक्त करण्यास मदत झाली.

## 10. Friendship week

Friendship Week was celebrated through engaging sessions for all students from Nursery to Grade 9, promoting kindness, inclusion, sharing, gratitude, respect, and a sense of belonging. Activities included a Friendship Pledge, handmade friendship-band exchange, shared meals under the theme "No One is Left Behind," and students also tied friendship bands to school Helpers didis and Bhaiyas, Teachers, and Aspiring Teachers as a gesture of appreciation and inclusion. The initiative encouraged students to look beyond their immediate friend circles, develop empathy and cooperation, and recognize every member of the school community as a valued part of their circle. These values will continue to be reinforced through activities such as "No One Eats Alone," buddy activities, kindness challenges, and appreciation activities.



**१०. मित्रता सप्ताह**

नर्सरी ते इयत्ता 9 पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मैत्री सप्ताह विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला, ज्यामध्ये दयाळूपणा, समावेशकता, वाटून घेणे, कृतज्ञता, आदर आणि आपलेपणाची भावना यांना प्रोत्साहन देण्यात आले. या उपक्रमांमध्ये मैत्री प्रतिज्ञा, हाताने बनवलेल्या मैत्रीच्या बँडची देवाणघेवाण, "कोणीही मागे राहणार



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

नाही" या संकल्पनेअंतर्गत एकत्र जेवण आणि शाळेतील मदतनीस दिदी आणि भैय्या, शिक्षक आणि Aspiring Teachers यांना कौतुक व समावेशकतेचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी मैत्रीचे बँड बांधणे यांचा समावेश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या नेहमीच्या मित्रपरिवाराच्या पलीकडे पाहण्यास, सहानुभूती आणि सहकार्य विकसित करण्यास आणि शाळेच्या समुदायातील प्रत्येक सदस्याला त्यांच्या वर्तुळाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून ओळखण्यास प्रोत्साहन मिळाले. "कोणीही एकटे जेवणार नाही", बडी उपक्रम, दयाळूपणाची आव्हाने आणि कौतुकाचे उपक्रम यांसारख्या उपक्रमांद्वारे ही मूल्ये पुढेही दृढ केली जातील.

## 11. School Anniversary

School Anniversary was celebrated on 5th August 2026 across Grades 1–9 through creative, student-centred activities that strengthened student voice, reflection, appreciation, collaboration, and a sense of belonging. Grades 3–5 created "My School Makes Me Smile" displays, while Grades 6–9 contributed to an Anniversary Graffiti Wall with memories, messages, doodles, and wishes. The activities encouraged students to express gratitude, celebrate meaningful school experiences, and develop a stronger sense of school identity. Going forward, anniversary celebrations will include greater student involvement, age-appropriate creative activities, and opportunities for students to contribute their ideas, artwork, and reflections.




**११. शाळेचा वर्धापन दिन**

5 ऑगस्ट 2026 रोजी इयत्ता 1–9 मध्ये सर्जनशील आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांद्वारे शाळेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग, चिंतन, कौतुक, सहकार्य आणि आपलेपणाची भावना अधिक दृढ झाली. इयत्ता 3–5 मधील विद्यार्थ्यांनी "माझी शाळा मला हसवते" या विषयावर प्रदर्शने तयार केली, तर इयत्ता 6–9 मधील विद्यार्थ्यांनी आठवणी, संदेश, चित्रे आणि शुभेच्छांसह वर्धापन दिनाच्या ग्राफिटी वॉलमध्ये योगदान दिले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना कृतज्ञता व्यक्त करण्यास, शाळेतील अर्थपूर्ण अनुभव साजरे करण्यास आणि शाळेबद्दलची आपली ओळख अधिक दृढ करण्यास प्रोत्साहन मिळाले. पुढे, वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा अधिक सहभाग, वयोगटानुसार योग्य सर्जनशील उपक्रम आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना, कलाकृती आणि चिंतन मांडण्याच्या अधिक संधींचा समावेश केला जाईल.

## 12. World Elephant Day

On 12th August 2026 world Elephant Day was celebrated at NMMC CBSE School 93 through a 15-minute, grade-appropriate session for all students from Nursery to Grade 5. Nursery–KG students engaged in elephant mask colouring and role play, while Grades 1–5 watched a short video on Project Elephant followed by a discussion on wildlife conservation. The session concluded with a World Elephant Day Pledge, encouraging students to protect elephants and their habitats, care for animals, and spread



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

awareness. The activity fostered empathy, environmental awareness, communication, and a sense of responsibility towards wildlife and the environment.



**१२. जागतिक हत्ती दिन**

१२ ऑगस्ट २०२६ रोजी NMMC CBSE शाळा क्रमांक ९३ येथे नर्सरी ते इयत्ता ५ वीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी १५ मिनिटांचे, इयत्तेनुसार योग्य असे सत्र आयोजित करून जागतिक हत्ती दिन साजरा करण्यात आला. नर्सरी ते बालवर्गातील विद्यार्थ्यांनी हत्तीच्या मुखवट्याला रंग देणे आणि भूमिकानाट्यात सहभाग घेतला. इयत्ता १ ली ते ५ वीतील विद्यार्थ्यांनी हत्ती संवर्धन प्रकल्पावरील एक छोटा माहितीपट पाहिला आणि त्यानंतर वन्यजीव संवर्धनावर चर्चा केली. सत्राचा समारोप जागतिक हत्ती दिनाच्या प्रतिज्ञेने करण्यात आला. या प्रतिज्ञेद्वारे विद्यार्थ्यांना हत्ती आणि त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करण्यासाठी, प्राण्यांची काळजी घेण्यासाठी आणि त्याबाबत जनजागृती करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, पर्यावरणाविषयी जागरूकता, संवादकौशल्य आणि वन्यजीव व पर्यावरणाप्रती जबाबदारीची भावना विकसित झाली.

## 13. Professional Development on Student Reflection for KG teachers

A Professional Development session was conducted for 10 Kindergarten teachers to strengthen their understanding of developing student reflection through age-appropriate and engaging activities. The session included practical examples, evidence of student reflection, and modelling of an exemplar to demonstrate effective facilitation. Teachers gained useful strategies to make reflection meaningful for young learners and will be supported through classroom observations, feedback, and the sharing of further evidence and exemplars.

**१३. केजी शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांच्या विचारमंथनावर आधारित व्यावसायिक विकास सत्र**



१० बालवाडी शिक्षकांसाठी वयोगटानुसार योग्य आणि मनोरंजक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये चिंतन विकसित करण्याबाबतची समज अधिक दृढ करण्यासाठी व्यावसायिक विकास सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या चिंतनाची व्यावहारिक उदाहरणे, त्याचे पुरावे आणि प्रभावी सुलभतेचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी एका आदर्श उदाहरणाचे मॉडेलिंग यांचा समावेश होता. शिक्षकांनी लहान विद्यार्थ्यांसाठी चिंतन अधिक अर्थपूर्ण बनवण्यासाठी उपयुक्त धोरणे आत्मसात केली आणि वर्ग निरीक्षणे,

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

अभिप्राय तसेच पुढील पुरावे आणि आदर्श उदाहरणे शेअर करण्याच्या माध्यमातून त्यांना पुढेही समर्थन दिले जाईल.

## 14. Independence Day Celebration – 15 August 2026




The Independence Day Celebration was organised on 15 August 2026 with enthusiastic participation from approximately 200 students across all grades through 16 activities, including a rally, parade and march past, flag hoisting, patriotic performances, pledges (Country Pledge, Nasha Mukti Pledge), cultural programmes, investiture ceremony for opposition leader, and student felicitation. The celebration fostered patriotism, national pride, unity, discipline, teamwork, confidence, leadership, and responsible citizenship. Students developed communication and stage skills through speeches, singing and performances, while leadership opportunities through the Investiture Ceremony encouraged responsibility and ownership.The programme also provided students with opportunities to work collaboratively and celebrate the importance of India's Independence. Going forward, celebrations will focus on increased student-led participation, structured practice, and greater opportunities for students to take up anchoring, leadership, and event-management roles.

**१४. स्वातंत्र्यदिन सोहळा – १५ ऑगस्ट २०२६**

15 ऑगस्ट 2026 रोजी सर्व इयत्तांमधील अंदाजे 200 विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाने स्वातंत्र्यदिन उत्सव आयोजित करण्यात आला. यामध्ये रॅली, परेड आणि मार्च पास्ट, ध्वजारोहण, देशभक्तीपर सादरीकरणे, प्रतिज्ञा (देशाची प्रतिज्ञा, नशामुक्ती प्रतिज्ञा), सांस्कृतिक कार्यक्रम, विरोधी पक्षनेत्यासाठी शपथविधी समारंभ आणि विद्यार्थ्यांचा सत्कार अशा 16 उपक्रमांचा समावेश होता. या उत्सवामुळे देशभक्ती, राष्ट्रीय अभिमान, एकता, शिस्त, सांघिक कार्य, आत्मविश्वास, नेतृत्व आणि जबाबदार नागरिकत्व या गुणांना प्रोत्साहन मिळाले. भाषणे, गायन आणि सादरीकरणांद्वारे विद्यार्थ्यांनी संवाद आणि रंगमंचावरील कौशल्ये विकसित केली, तर शपथविधी समारंभातील नेतृत्वाच्या संधींमुळे जबाबदारी आणि स्वामित्वाची भावना वाढीस लागली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना सहकार्याने काम करण्याची आणि भारताच्या स्वातंत्र्याचे महत्त्व साजरे करण्याची संधीही मिळाली. पुढे, उत्सवांमध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील सहभाग वाढवणे, संरचित सराव आणि सूत्रसंचालन, नेतृत्व आणि कार्यक्रम व्यवस्थापनाच्या भूमिका स्वीकारण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिक संधी देण्यावर भर दिला जाईल.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

## 15. Paramparik Art

The Sanjhi Art Workshop was conducted on 17 August for 30 Grade 8 students, introducing them to the traditional art of intricate hand-cut paper designs from Mathura. Led by artisan Mohan Kumar, the hands-on workshop helped students develop patience, concentration, precision, creativity, and appreciation for India's cultural heritage. The experience also fostered respect for traditional artisans and highlighted the importance of preserving indigenous art forms. Going forward, Paramparik Art plans to organise annual workshops featuring master artists from across India, providing students opportunities to learn directly from practitioners and support the preservation of traditional arts.




**१५. पारंपरिक कला**

17 ऑगस्ट रोजी 30 इयत्ता 8 मधील विद्यार्थ्यांसाठी सांज्ही कला कार्यशाळा आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये त्यांना मथुरा येथील पारंपरिक, बारकाईने हाताने कागद कापून तयार केल्या जाणाऱ्या कलाकृतींची ओळख करून देण्यात आली. कलाकार मोहन कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रत्यक्ष अनुभवाधारित कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संयम, एकाग्रता, अचूकता, सर्जनशीलता आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाबद्दलची प्रशंसा विकसित झाली. या अनुभवामुळे पारंपरिक कलाकारांप्रती आदराची भावना निर्माण झाली आणि स्थानिक पारंपरिक कला प्रकारांचे जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. पुढे, Paramparik Art तर्फे दरवर्षी भारतभरातील विविध मास्टर कलाकारांचा सहभाग असलेल्या कार्यशाळा आयोजित करण्याची योजना आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कलाकारांकडून शिकण्याच्या आणि पारंपरिक कलांच्या जतनाला हातभार लावण्याच्या संधी मिळतील.

## 16. Akanksha Futsal Football Competition 2026

The Akanksha Futsal Football Competition saw participation from 9 Akanksha schools, with 28 students from our school selected based on football skills, fitness, practice, teamwork, discipline, game understanding, and performance during trials. Students underwent structured preparation focused on passing, dribbling, ball control, shooting, attacking, defending, fitness, match strategy, and team coordination, with continuous support from the PE Coach and encouragement from families. All participating teams progressed to the Quarter-Final stage; while no medal was secured, reaching the Quarter-Finals was a significant achievement and provided valuable competitive exposure. The



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

competition strengthened students' football skills, fitness, teamwork, communication, discipline, confidence, and decision-making under pressure, while helping them identify areas for improvement. Going forward, regular training, practice matches, technical and tactical development, player assessments, greater competitive exposure, and family involvement will be prioritised, with the goal of progressing beyond the Quarter-Finals and competing for a podium position.

१६. आकांक्षा **फुत्सल** फुटबॉल स्पर्धा २०२६

अकांक्षा फुत्सल फुटबॉल स्पर्धेत अकांक्षाच्या ९ शाळांनी सहभाग घेतला. आमच्या शाळेतील २८ विद्यार्थ्यांची



फुटबॉल कौशल्ये, तंदुरुस्ती, सराव, सांघिक कार्य, शिस्त, खेळाची समज आणि निवड चाचण्यांमधील कामगिरीच्या आधारे निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना पासिंग, ड्रिबलिंग, बॉल कंट्रोल, शूटिंग, आक्रमण, बचाव, तंदुरुस्ती, सामन्याचे धोरण आणि संघातील समन्वय यांवर केंद्रित संरचित प्रशिक्षण देण्यात आले, तसेच शारीरिक शिक्षण मार्गदर्शक यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि कुटुंबीयांचे प्रोत्साहन मिळाले. सहभागी झालेल्या सर्व संघांनी क्वार्टर फायनल टप्प्यात प्रवेश केला; जरी कोणतेही पदक मिळाले नाही, तरी क्वार्टर फायनलपर्यंत पोहोचणे ही एक महत्त्वपूर्ण कामगिरी होती आणि यामुळे विद्यार्थ्यांना मौल्यवान स्पर्धात्मक अनुभव मिळाला. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांची फुटबॉल कौशल्ये, तंदुरुस्ती, सांघिक कार्य, संवाद, शिस्त, आत्मविश्वास आणि दबावाखाली निर्णय घेण्याची क्षमता अधिक मजबूत झाली, तसेच त्यांना सुधारणा करण्याच्या क्षेत्रांची ओळख पटवण्यास मदत झाली. पुढे, नियमित प्रशिक्षण, सराव सामने, तांत्रिक आणि रणनीतिक विकास, खेळाडूंचे मूल्यमापन, अधिक स्पर्धात्मक अनुभव आणि कुटुंबीयांचा सहभाग यांना प्राधान्य दिले जाईल, ज्याचा उद्देश क्वार्टर फायनलच्या पुढे प्रगती करणे आणि पदकासाठी स्पर्धा करणे हा असेल.

## PARENT COMMUNITY ENGAGEMENT AND DEVELOPMENT

### 17. Nutrition & First Aid Awareness Initiative – Sr. KG to Grade 9

The Nutrition & First Aid Awareness Initiative successfully reached approximately 1,600 students from Sr. KG through Grade 9 across eight session days between August 11 and August 21, 2026. Designed to build a health-conscious and safety-aware school environment, the programme covered essential topics including balanced diets, personal hygiene, hydration, basic emergency response, and immediate first aid care for injuries such as cuts, burns, sprains, and fractures.To ensure age-appropriate delivery, sessions were structured systematically across grade bands. Respective teachers conducted 20-minute daily afternoon sessions (1:00 PM – 1:20 PM) for Sr. KG to Grade 3 students from August 11 to 14. For older cohorts, the initiative leveraged an impactful peer-learning model supported by the Physical Education Coach. A selected team of 28 Student Leaders from Grades 8 and 9 underwent planning, preparation, and practical demonstration training to lead morning meeting sessions (7:20 AM – 7:40 AM) for Grades 6 to 9 during the first week, followed by Grades 4 and 5 from August 18 to 21.




This dual-action approach yielded significant educational benefits across all grade levels. While younger participants acquired practical knowledge to make healthier lifestyle choices and handle basic injury responses, the Grade 8 and 9 Student Leaders gained valuable experiential growth. Facilitating these peer-led interactions allowed the student leaders to strengthen their confidence, public speaking, teamwork, and leadership skills. Ultimately, the comprehensive coverage successfully instilled essential habits of safety, nutrition, and civic responsibility throughout the student body.

**१७. पोषण आणि प्रथमोपचार जागरूकता उपक्रम – सिनियर केजी ते इयत्ता ९ वी**

'पोषण आणि प्रथमोपचार जागरूकता उपक्रम' ११ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यानच्या आठ सत्रांच्या दिवसांत सिनिअर के.जी. ते इयत्ता ९ वी मधील सुमारे १,६०० विद्यार्थ्यांपर्यंत यशस्वीरीत्या पोहोचला. आरोग्याविषयी आणि सुरक्षेविषयी जागरूक शालेय वातावरण निर्माण करण्यासाठी आखलेल्या या उपक्रमात संतुलित आहार, वैयक्तिक स्वच्छता, शरीरातील पाण्याचे प्रमाण, मूलभूत आपत्कालीन प्रतिसाद आणि जखमा, भाजणे, लचकणे व हाड मोडणे यांसारख्या दुखापतींसाठी त्वरित प्रथमोपचार यांसारख्या आवश्यक विषयांचा समावेश करण्यात आला होता.

वयोगटानुसार योग्य अध्यापन व्हावे यासाठी, सत्रांची रचना इयत्तांच्या गटानुसार पद्धतशीरपणे करण्यात आली होती. संबंधित शिक्षकांनी ११ ते १४ ऑगस्ट दरम्यान दुपारी १:०० ते १:२० या वेळेत सिनिअर के.जी. ते इयत्ता ३ री च्या विद्यार्थ्यांसाठी दररोज २० मिनिटांची सत्रे घेतली. मोठ्या विद्यार्थ्यांसाठी, शारीरिक शिक्षण (PE) शिक्षकांच्या सहकार्याने प्रभावी 'पिअर-लर्निंग' (Peer-Learning - वर्गमित्रांकडून शिकण्याची पद्धत) मॉडेलचा वापर करण्यात आला. इयत्ता ८ वी



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

आणि ९ वी मधील निवडक २८ विद्यार्थी प्रतिनिधींना (Student Leaders) नियोजन, पूर्वतयारी आणि प्रात्यक्षिकांचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यांनी पहिल्या आठवड्यात इयत्ता ६ वी ते ९ वी साठी आणि त्यानंतर १८ ते २१ ऑगस्ट दरम्यान इयत्ता ४ थी व ५ वी साठी सकाळी ७:२० ते ७:४० या वेळेत 'मॉर्निंग मीटिंग' सत्रांचे नेतृत्व केले.

या दुहेरी कार्यपद्धतीमुळे सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना मोठे शैक्षणिक फायदे झाले. लहान विद्यार्थ्यांनी निरोगी जीवनशैली निवडींचे आणि प्राथमिक दुखापतींना सामोरे जाण्याचे व्यावहारिक ज्ञान मिळवले, तर इयत्ता ८ वी आणि ९ वी च्या विद्यार्थी प्रतिनिधींना मोलाचा अनुभव मिळाला. या सत्रांचे नेतृत्व केल्यामुळे विद्यार्थी प्रतिनिधींचा आत्मविश्वास, वक्तृत्व, संघभावना आणि नेतृत्वगुण वाढीस लागले. शेवटी, या व्यापक उपक्रमामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षा, पोषण आणि नागरी जबाबदारीच्या आवश्यक सवयी यशस्वीरीत्या रुजवल्या गेल्या.

## 18. Grade 4 to 9 - PTM



An interactive parents' workshop was successfully conducted for families of students from Grades 4 to 9, focusing on the critical theme of "Physical, Emotional & Social Safety." The session aimed to deepen parents' understanding of the various dimensions of child safety while empowering them to foster a secure, supportive, and nurturing environment both at home and within the community. A total of 125 parents actively participated in the meeting.*Key Highlights & Session Coverage:* The school social worker guided parents through actionable insights and real-world scenarios to address the evolving safety needs of growing children:

- Understanding Safety Dimensions: Identifying physical, emotional, and social risks across everyday environments, including online and community spaces.
- Emotional Needs & Distress Signs: Recognizing subtle behavioral shifts and indicators of emotional distress or anxiety in children.
- Communication & Trust: Promoting open, age-appropriate conversations and establishing non-judgmental channels of communication at home.
- Boundaries & Help-Seeking: Setting healthy personal boundaries and equipping children with the confidence to seek help when feeling unsafe or uncomfortable.
- Actionable Interventions: Equipping parents with practical strategies to identify safety concerns early and respond to their child's needs with empathy and authority.

**१८. इयत्ता ४ थी ते ९ वी - पालक-शिक्षक सभा**

इयत्ता ४ थी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी "शारीरिक, भावनिक आणि सामाजिक सुरक्षितता" या महत्त्वपूर्ण विषयावर एक परस्परसंवादी (interactive) कार्यशाळा यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. या सत्राचा मुख्य उद्देश पालकांना बालसुरक्षेच्या विविध पैलूंची जाणीव करून देणे आणि घर तसेच समाजात एक सुरक्षित, आधारदायक आणि पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांना सक्षम करणे हा होता. या सभेत एकूण १२५ पालकांनी सक्रिय सहभाग घेतला.

शाळेच्या सोशल वर्कर (सामाजिक कार्यकर्त्या) यांनी पालकांना वाढत्या मुलांच्या सुरक्षेच्या गरजा समजून घेण्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोन आणि वास्तववादी उदाहरणांद्वारे मार्गदर्शन केले:



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

- सुरक्षिततेचे विविध पैलू समजून घेणे: दैनंदिन वातावरणात, तसेच ऑनलाइन आणि सामाजिक स्तरावर उद्भवणारे शारीरिक, भावनिक आणि सामाजिक धोके ओळखणे.
- भावनिक गरजा आणि तणावाची लक्षणे: मुलांमधील वर्तनातील सूक्ष्म बदल आणि भावनिक तणाव किंवा चिंतेची लक्षणे ओळखणे.
- संवाद आणि विश्वास: मुलांच्या वयानुसार त्यांच्याशी उघडपणे बोलण्यास प्रोत्साहन देणे आणि घरात कोणत्याही पूर्वग्रहाविना संवाद साधता येईल असे वातावरण तयार करणे.
- योग्य मर्यादा आणि मदत मागणे: वैयक्तिक सुरक्षिततेच्या योग्य मर्यादा ठरवणे आणि असुरक्षित किंवा अस्वस्थ वाटल्यास मदत मागण्यासाठी मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
- प्रत्यक्ष उपाययोजना: सुरक्षेशी संबंधित समस्या वेळीच ओळखण्यासाठी आणि मुलांच्या गरजांना सहानुभूतीने व योग्य अधिकाराने प्रतिसाद देण्यासाठी पालकांना व्यावहारिक पद्धतींची माहिती देणे.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33